धनादेश वसूली धोरण

१. ओळख

अनेक बँकांकडून करण्यात आलेली रक्कम भरणा, हिशेबपूर्ती प्रणाली यांच्यामधील तंत्रज्ञानिक प्रगती आणि कार्य प्रणाली व प्रक्रियेतील गुणात्मक बदल इत्यादी गोष्टी लक्षात घेऊन, भारतीय रिझर्व्ह बँकेने, १ नोव्हेंबर २००४ पासून प्रभावी अशा प्रकारे, १) स्थानिक/नगरबाह्य धनादेशांची तत्काळ पत, २) स्थानिक/नगरबाह्य संलेखाचा कालावधी आणि ३) प्रलंबित वसूलीसाठी व्याजाचा भरणा, याबाबतीत व्यापारी बँकाना याआधी दिलेल्या सूचना मागे घेतल्या आहेत. ही बंधनकारक मार्गदर्शकतत्त्वे मागे घेतल्याने धनादेश आणि इतर संलेख यांच्या वसूलीबद्दलची कार्यक्षमता वाढण्यास मदत होणे अपेक्षित आहे. बँकेचे वसूली धोरण म्हणजे आमच्या ग्राहकांना अधिक चांगली सेवा प्रदान करणे आणि कामगिरीचा अधिक चांगला दर्जा प्रस्थापित करणे याबाबतीत आम्ही करत असलेल्या प्रयत्नांचे प्रतिबिंब आहे. ग्राहकांप्रती पारदर्शकता आणि प्रामाणिकपणा या तत्त्वांवर हे धोरण आधारित आहे. ग्राहकांना जलद वसूली प्रदान करता यावी यासाठी तंत्रज्ञानाचा अधिक वापर करण्यास बँक बांधील आहे. ह्या धोरण दस्तऐवजामध्ये खाली घटकांचा समावेश आहेः

- भारतातील आणि परदेशातील केंद्रावर, स्थानिकरीत्या प्रदेय असणाऱ्या धनादेशांची आणि इतर संलेखांची वसूली
- संलेखांच्या वसूलीसाठी कालावधी नियमांसंबंधित आमची बांधिलकी
- नगरबाह्य संलेखांची आवक रक्कमेच्या संपादित करण्यासाठी असलेल्या कालावधी नियमांची पूर्तता करण्यास बँक अपयशी ठरण्याच्या बाबतीत व्याज भरणा करण्याचे धोरण
- प्रवासादरम्यान गहाळ झालेल्या संलेखांच्या वसूलीची हाताळणी करण्याविषयी आमचे धोरण

२. वसूली व्यवस्था

२. १ स्थानिक धनादेश

स्थानिकरीत्या प्रदेय असणारे सर्व धनादेश आणि इतर परक्राम्य संलेख हे केंद्रावर प्रचलित असणाऱ्या समाशोधन प्रणालीद्वारे सादर करण्यात येतील. शाखेच्या काउंटरवर जमा करण्यात आलेले धनादेश आणि शाखेच्या आवारातील कलेक्शन बॉक्समध्ये जमा करण्यात आलेले धनादेश हे, शाखेचे कामकाज सुरू झाल्यापासून एका तासापर्यंत सादर करण्यात आले असल्यास, त्याच दिवशी समाशोधनासाठी सादर करण्यात येतील. कट–ऑफ वेळेनंतर जमा करण्यात आलेले धनादेश आणि बँकेच्या शाखेच्या आवाराबाहेरील कलेक्शन बॉक्समध्ये जमा करण्यात आलेले धनादेश, ऑफ–साइड एटीएम्स समाविष्ट, हे पुढील समाशोधन चक्रामध्ये सादर करण्यात येतील. तथापि प्रत्येक ठिकाणच्या समाशोधन वेळेवर अवलंबून अशा प्रकारे विशिष्ट कट–ऑफ वेळा ह्या प्रत्येक शाखेमध्ये प्रदर्शित करण्यात येतील. धोरण म्हणून, समाशोधन हिशेबपूर्तीच्या दिवशी ग्राहकाच्या खात्यामध्ये बँकेद्वारे पत जमा करण्यात येईल. अशा प्रकारे जमा करण्यात आलेली रक्कम काढण्यासाठी समाशोधनगृहाच्या धनादेश परतवणी वेळापत्रकाप्रमाणे अनुमती देण्यात येईल. जेथे लागू असेल तेथे, उच्च–मूल्य समाशोधन (त्याच दिवशी पत) सुविधा प्रदान करण्यात येईल.

समाशोधनगृह उपलब्ध नसणाऱ्या केंद्रावर स्थित असलेल्या बँकेच्या शाखा ह्या स्थानिक धनादेश काउंटरच्या ठिकाणी आदेशिती बँकेवर सादर करतील आणि अशा बाबतीत लवकरात लवकर आवक जमा करण्याचा बँकेचा प्रयत्न असेल.

२.२ नगरबाह्य धनादेश

नगरबाह्य केंद्रांच्या ठिकाणी इतर बँकांवर काढण्यात आलेले धनादेश हे सामान्यत: त्या केंद्रांवरील बँकेच्या शाखांद्वारे जमा करण्यात येतील. जेथे बँकेची स्वत:ची शाखा नाही, तेथे वसूलीसाठी थेट आदेशिती बँकेकडे संलेख पाठविण्यात येईल किंवा प्रतिव्यवहारी बँकेद्वारे जमा करण्यात येईल. भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारे देऊ करण्यात आलेल्या राष्ट्रीय समाशोधन सेवेचा देखील,जेथे अशा प्रकारची वसूली सेवा उपलब्ध आहे त्या केंद्रांवर, बँक वापर करेल.

नगरबाह्य केंद्रांच्या ठिकाणी बँकेच्या स्वत:च्या शाखेवर काढण्यात आलेले धनादेश हे प्रचलित आंतर–शाखा व्यवस्था वापरून जमा करण्यात येतील. मध्यवर्ती प्रक्रिया व्यवस्थेद्वारे जोडणी करण्यात आलेल्या शाखा आणि तिच्या ग्राहकांना कोणत्याही ठिकाणी बँकिंग सेवा देऊ करणाऱ्या शाखा ह्या कट–ऑफ वेळेच्या आधी जमा करण्यात आलेल्या आणि तिच्या कोणत्याही शाखांवर काढण्यात आलेल्या नगरबाह्य संलेखाच्या बाबतीत तिच्या ग्राहकांना त्याच दिवशी पत उपलब्ध करून देतील.

२.३ परदेशामध्ये प्रदेय असणारे धनादेश

जेथे बँकेचे शाखा व्यवहार (किंवा अनुषंगी कंपनी इत्यादींद्वारे बँकिंग व्यवहार)चालतात, त्या ठिकाणच्या परदेशी केंद्रावर प्रदेय असलेले धनादेश हे त्या कार्यालयाद्वारे जमा करण्यात येतील. ज्या देशांमध्ये/केंद्रांमध्ये प्रतिव्यवहारी बँकेची उपस्थिती आहे, त्या ठिकाणी प्रतिव्यवहारी बँकेच्या सेवेचा वापर करण्यात येईल. बँकेची किंवा तिचे प्रतिव्यवहारी बँकेची जेथे थेट उपस्थिती नाही अशा केंद्रांच्या ठिकाणी परदेशी बँकांवर काढण्यात आलेले धनादेश हे प्रतिव्यवहारी बँकांपैकी एका बँकेसोबत सांभाळण्यात आलेल्या बँकेच्या संबंधित नोस्ट्रो खात्यामध्ये पत आवक करण्याच्या सूचनेसह आदेशिती बँकेकडे पाठविण्यात येईल.

काही महत्त्वपूर्ण चलनांचे कूलिंग कालावधी खाली देण्यात आले आहेतः

कूलिंग कालावधी दिवस		
चलन		कूलिंग कालावधी– कामकाज दिवस
यूएसडी	न्यूयॉर्क	६
यूएसडी	न्यूयॉर्क व्यतिरिक्त समाशोधन	१४
जीबीपी		१०
युरो		१०
एईडी		८
एसजीडी		२१
सीएडी		२१
विनिमय दरः कूलिंग कालावधीनंतर पत जमा करण्यादिवशीचे लागू दर		

२.४ स्थानिक/नगरबाह्य धनादेश/संलेख यांची तत्काळ पतः

बँकेसोबत पूर्वव्यवस्था करून ग्राहकांच्या संलेख वसूलीसाठी तत्काळ पत देण्यात येईल. ज्या ठिकाणी औपचारीक समाशोधनगृह उपलब्ध नाही अशा केंद्रांवर स्थानिक धनादेशांच्या बाबतीत आणि खात्याची समाधानकारक हाताळणीमध्ये रु.१५,००० पर्यंत नगरबाह्य धनादेश/संलेख यांच्या बाबतीत तत्काळ पत सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल.

धोरणान्वये, डिमांड ड्राफ्ट, व्याज/लाभांश अधिपत्र यांसारख्या पूर्वदत्त संलेखांची हाताळणी धनादेशाशी सममूल्य अशा प्रकारे करण्यात येईल. बँकेद्वारे तिच्या स्वत:च्या शाखेवर काढण्यात आलेल्या डिमांड ड्राफ्ट/बँकरचे धनादेश यांसारख्या पूर्वदत्त संलेखांसाठी, बँकेला याआधीच निधी प्राप्त झालेला असल्याने बँक तत्काळ पत उपलब्ध करेल.

ज्या बदल्यात तत्काळ पत देण्यात आली आहे, असा धनादेश नाकारण्याच्या बाबतीत, बँकेला जितक्या कालावधीसाठी निधी प्राप्त झालेला नाही, त्या कालावधीसाठी, प्रत्येक ग्राहकाकरिता संमत करण्यात आलेल्या अधिकर्ष मर्यादेसाठी लागू दरानुसार ग्राहकाकडून व्याजाची वसूली करण्यात येईल.

ह्या धोरणाच्या हेतूसाठी, खालील गोष्टी अंर्तभूत असणारे खाते हे समाधानकारक हाताळणी खाते मानण्यात येईलः

ए) किमान ६ महिने आधी खाते उघडण्यात आलेले आहे आणि केवायसी नियमांचे अनुपालन केले नाही.

बी) खात्याची हाताळणी समाधानकारक आहे आणि बँकेला कोणतेही अनियमित व्यवहार आढळलेले नाही.

सी) तत्काळ पत देण्यात आलेला कोणताही धनादेश/कोणताही संलेख हे आर्थिक कारणांस्तव अदत्त म्हणून परत आलेले नाहीत.

डी) गत काळामध्ये कोणत्याही रकमेच्या वसूलीसाठी बँकेला कोणतीही अडचण आलेली नाही, यामध्ये तत्काळ पत देण्यात आल्यानंतर परत आलेल्या धनादेशांचा समावेश आहे.

खरेदी धनादेशाच्या मूल्यावर वेळोवेळी ठरविण्यात आलेल्या दरांनुसार आउट ऑफ पॉकेट खर्च आणि कमिशन बँकेद्वारे घेण्यात येईल. आकारण्यात आलेला अशा कमिशनचा दर हा प्रभारांच्या सर्वसाधारण अनुसूचीमध्ये देण्यात आलेला आहे.

२.५ स्थानिक/नगरबाह्य धनादेशाची खरेदी

बँक ही तिच्या स्वेच्छानिर्णयानुसार, ग्राहकाकडून सादर करण्यात आलेले स्थानिक/नगरबाह्य धनादेश हे पूर्वव्यवस्थेप्रमाणे खरेदी करु शकते. धनादेश खरेदी करताना, खात्याच्या समाधानकारक हाताळणीशिवाय, धनादेशाच्या आदेशितीची योग्यता हा घटक देखील विचारात घेण्यात येईल.

२.६ जलद समाशोधन

नगरबाह्य धनादेशांच्या वसूलीचा कालावधी कमी करण्याच्या उद्देशाने भारतीय रिझर्व्ह बँकेने 'जलद समाशोधन' ही प्रणाली सुरू केली आहे. जलद समाशोधन प्रणालीमध्ये स्थानिक समाशोधनाद्वारे नगरबाह्य धनादेशांची वसूली करण्यात येते. वसूली आधाराद्वारे नगरबाह्य धनादेशांच्या वसूलीसाठी आदेशिती केंद्रावर अवलंबून अशा प्रकारे जवळपास १ ते २ आठवड्यांचा कालावधी लागतो. जलद समाशोधनामध्ये हा कालावधी दोन ते तीन कामकाज दिवस इतका कमी होतो.

आरबीआयतर्फे देऊ करण्यात येणाऱ्या जलद समाशोधन सुविधमध्ये सध्याच्या घडीला ६६ केंद्रांचा समावेश आहे. सीबीएस इनॅबल्ड बँकेच्या शाखांवर काढण्यात आलेले, व्यवहार कोड १०,११,१३ असणारे धनादेश हे जलद समाशोधनाकरिता सादर करण्यासाठी पात्र आहेत. जलद समाशोधन प्रणालीचा भाग नसणाऱ्या बँकांवर किंवा बँकेच्या शाखांवर काढण्यात आलेल्या पे ऑर्डर्स, डिमांड ड्राफ्ट, शासकीय संलेख आणि धनादेश हे जलद समाशोधन अंतर्गत वसूलीसाठी पात्र नाहीत. नवीन समाशोधन प्रणाली ही नगरबाह्य धनादेशांचे जमा करण्यात आलेल्या शाखेच्या ठिकाणीच

समाशोधन करण्याची सुविधा प्रदान करते तसेच यामुळे गंतव्य ठिकाणी, म्हणजेच संलेखाचा आदेशक त्याचे खाते बाळगतो त्या केंद्रावर, वास्तविक संलेखाचे स्थानांतर होत नाही.

जलद समाशोधन केंद्रांची यादी आणि सहभागी बँक शाखांचा तपशील ह्या गोष्टी आरबीआयच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

३. स्थानिक धनादेश /नगरबाह्य धनादेश/संलेख यांच्या वसूलीसाठी कालावधी

पत समाशोधनामध्ये सादर करण्यात आलेले स्थानिक धनादेश हे समाशोधनामध्ये रकमे च्या हिशेबपूर्तीच्या दिवशी उपलब्ध करून देण्यात येतील. आणि प्रचलित समाशोधन परतावा नियमांनुसार खातेधारकाला रक्कम काढता येईल.

उच्च मूल्य समाशोधनामध्ये (रु.१ लाख इतक्या किमान मूल्यासह किंवा स्थानिक समाशोधनगृहाने ठरविल्याप्रमाणे) सादर करण्यात आलेले धनादेश/संलेख हे त्याच दिवशी (उच्च मूल्य/त्याच दिवशी समाशोधन याअंतर्गत समाविष्ट असणाऱ्या क्षेत्रांसाठीच केवळ लागू)जमा करण्यात येतील.

देशामधील केंद्रावर वसूलीसाठी पाठविण्यात आलेल्या धनादेशांसाठी आणि इतर संलेखांसाठी पुढील कालावधी नियम लागू राहतील:

ए) कोणत्याही बँकेच्या शाखेमध्ये जमा करण्यात आलेले आणि राज्यांच्या राजधानीमध्ये प्रदेय असलेले नगरबाह्य धनादेश हे कमाल ७ दिवसांच्या कालावधीमध्ये जमा करण्यात येईल. जमा करण्याच्या ठिकाणी आणि प्रदेय ठिकाणी येणाऱ्या सुट्ट्या वगळून दिवसांची गणना केली जाईल.

बी) प्रमुख शहरांवर काढण्यात आलेले धनादेश हे जमा करण्यात आल्याच्या तारखेपासून कमाल १० दिवसांच्या कालावधीमध्ये जमा खाती घालण्यात येतील. जमा करण्याच्या ठिकाणी आणि प्रदेय ठिकाणी येणाऱ्या सुट्ट्या वगळून दिवसांची गणना केली जाईल.

सी) वर उल्लेख करण्यात आल्या व्यतिरिक्त केंद्रावर काढण्यात आलेल्या धनादेश हे जमा करण्यात आल्याच्या तारखेपासून कमाल १४ दिवसांच्या कालावधीमध्ये जमा खाती घालण्यात येतील. जमा करण्याच्या ठिकाणी आणि प्रदेय ठिकाणी येणाऱ्या सुट्ट्या वगळून दिवसांची गणना केली जाईल.

धनादेश लवकर संपादित करण्याकरिता पाठपुरावा करण्यासाठी बँकेद्वारे सर्व आवश्यक पावले उचलण्यात येतील आणि म्हणून विलंबासह कोणत्याही संपादनासाठी व्यापक नियम करता येऊ शकत नाही आणि त्यावर परिस्थितीप्रमाणे प्रत्येक प्रकरणानुसार निर्णय घेणे आवश्यक आहे. बँकेद्वारे किंवा तिच्या एजन्टद्वारे समाशोधन बँकेला/ आदेशिती बँकेला नगरबाह्य धनादेश सुपुर्द करण्याच्या बाबतीत, आरबीआयने घालून दिलेल्या कालावधी नियमांप्रमाणे संलेखाचे/संलेखांचे समाशोधन करण्याची जबाबदारी समाशोधन बँकेची असेल. समाशोधन/ आदेशिती बँकेद्वारे असमर्थनीय विलंब होण्याच्या बाबतीत, प्रलंबित वसूलीसाठी व्याजाचा भरणा करण्याची पात्रता बँकेद्वारे ठरविली जाईल.

परदेशी बँकांवर काढण्यात आलेले धनादेश हे 'सर्वोत्तम प्रयत्न' या तत्त्वावर वसूलीसाठी स्वीकारले जातील. प्रतिव्यवहारी बँकेच्या कोणत्याही विशिष्ट वसूली व्यवस्थेच्या बाबतीत, संबंधित देशांमध्ये लागू असणारा कूलिंग कालावधी विचारात

घेतल्यानंतर, प्रतिव्यवहारी बँकेसोबत असणाऱ्या बँकेच्या नोस्ट्रो खात्यामध्ये आवक जमा झाल्यानंतर संबंधित व्यक्तीला बँकेद्वारे पत देण्यात येईल.

४. स्थानिक/नगरबाह्य धनादेशांच्या प्रलंबित वसूलीसाठी व्याजाचा भरणा

बँकेच्या भरपाई धोरणानुसार, वर उल्लेख करण्यात आलेल्या कालावधीपेक्षा (पॉइंट ३)अधिक विलंब झाल्यास वसूली संलेखाच्या रकमेवर बँकेद्वारे तिच्या ग्राहकाला व्याजाचा भरणा करण्यात येईल. अशा प्रकारचे व्याज हे ग्राहकांकडून कोणतीही मागणी न करता सर्व प्रकारच्या खात्यांवर प्रदान करण्यात येईल.

वर पॉइंट ३ मध्ये नमूद करण्यात आलेल्या कालावधीपेक्षा अधिक विलंब होण्याच्या बाबतीत प्रलंबित वसूलीसाठी खालील दरांनुसार व्याजाचा भरणा करण्यात येईलः

ए) स्थानिक/नगरबाह्य धनादेशांच्या वसूलीसाठी वर उल्लेख करण्यात आलेल्या कालावधीच्या पुढील (पॉइंट ३) प्रलंबित कालावधीसाठी बॅकेचा बचत दर.

बी) ४५ दिवसांपेक्षा अधिक विलंब झाल्यास, संबंधित कालावधीसाठी मुदत ठेवीच्या लागू दरांनुसार व्याजाचा भरणा करण्यात येईल.

सी) असामान्य विलंब होण्याच्या बाबतीत, म्हणजेच ९० दिवसांपेक्षा अधिक विलंब झाल्यास, संबंधित मुदत ठेव दर अधिक २% इतक्या दराने व्याजाचा भरणा करण्यात येईल.

डी) वसूली अंतर्गत असणारी धनादेशाची आवक ही ग्राहकांच्या अधिकर्ष/ कर्ज खात्यामध्ये जमा करण्याच्या बाबतीत, कर्ज खात्याला लागू असणाऱ्या दरानुसार व्याजाचा भरणा करण्यात येईल. असामान्य विलंबाच्या बाबतीत, कर्ज खाते दर अधिक २% इतक्या दराने व्याजाचा भरणा करण्यात येईल.

केवळ भारतामध्ये वसूलीसाठी पाठविण्यात आलेल्या संलेखांसाठीच वर देण्यात आलेला व्याजाचा भरणा लागू राहील.

५. समाशोधन प्रक्रियेमध्ये किंवा प्रदायी बॅकेच्या शाखेमध्ये नाकारण्यात आलेले धनादेश/ प्रवासादरम्यान गहाळ झालेले धनादेश/संलेख

वसूलीसाठी स्वीकारण्यात आलेले धनादेश किंवा संलेख प्रवासादरम्यान किंवा समाशोधन प्रक्रियेमध्ये किंवा प्रदायी बॅकेच्या शाखेमध्ये गहाळ झाल्यास, असे नुकसान लक्षात आल्यानंतर बँक ही तत्काळ सदर गोष्ट खातेधारकाला सूचित करेल जेणेकरून खातेधारक हा आदेशकाला भरणा थांबविण्याची (स्टॉप पेमेंटची) माहिती देऊ शकेल आणि गहाळ झालेल्या धनादेशाची/संलेखाची पत उपलब्ध न झाल्याने त्याच्या/तिच्याद्वारे (खातेधारकाद्वारे) देण्यात आलेल्या कोणत्याही धनादेशांचा अवमान, असे धनादेश असल्यास, होणार नाही याची काळजी घेऊ शकेल. धनादेशाच्या आदेशकाकडून संलेखाची दुसरी प्रत मिळविण्याकरिता बँकेद्वारे ग्राहकाला संपूर्ण सहकार्य केले जाईल. धनादेश बँकेद्वारे गहाळ होण्याच्या बाबतीत, भरणा थांबविण्यासाठी काही शुल्क प्रदान करायचे असल्यास, ते शुल्क बँकेद्वारे भरण्यात येईल.

ग्राहकाद्वारे वसूलीसाठी जमा करण्यात आलेल्या धनादेशाच्या बाबतीत, प्रदायी बँकेद्वारे धनादेश आदृत न करण्यात आल्यास, असा परत आलेला संलेख हा बँकेकडे नोंद असलेल्या ग्राहकांच्या पत्त्यावर परत पाठविण्यात येईल. प्रभारांच्या सर्वसाधारण अनुसूचीमध्ये देण्यात आल्याप्रमाणे सदर बाबीसाठी धनादेश परतावा शुल्क आकारण्यात येईल.

बँकेच्या भरपाईधोरणानुसार, गहाळ झालेल्या संलेखाच्या बाबतीत खातेधारजकाला खालीलपद्धतीने भरपाई देण्यात येईलः

ए) वसूलीसाठी (पॉइंट ३ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे)निर्धारित करण्यात आलेल्या वेळेनंतर ग्राहकाला संलेख गहाळ झाल्याची सूचना देण्याच्या बाबतीत, निर्धारित वसूली वेळेच्या वरील कालावधीसाठी वर नमूद करण्यात आलेल्या दरानुसार व्याजाचा भरणा करण्यात येईल.

बी) बँकेतून/संस्थेतून संलेखाची दुसरी प्रत मिळविण्यासाठी सदर बँकेद्वारे/संस्थेद्वारे शुल्क आकारण्याच्या बाबतीत, ग्राहकाला धनादेशाची/संलेखाची दुसरी प्रत मिळविताना झालेल्या रास्त खर्चासाठी त्याने/तिने पावती सादर केल्यानंतर बँकेद्वारे भरपाई देण्यात येईल.

६. आपात्कालीन घटना

बँकेच्या नियंत्रणापलीकडे असणाऱ्या तसेच बँकेला विनिर्दिष्ट सेवा सुपुर्दगी प्रमाणकांनुसार तिची कामगिरी पार पाडण्यास प्रतिबंध करणाऱ्या अनपेक्षित घटना (यादवी दंगल, घातपात, कामगार तंटे, अपघात, आग, नैसगिक संकट, किंवा इतर 'ॲक्ट्स ऑफ गॉड', युद्ध, बँकेच्या किंवा तिच्या प्रतिव्यवहारी बँकेच्या सुविधांना हानी पोहोचणे, सामन्य संपर्क साधनांचा अभाव असणे, इत्यादी) घडल्यामुळे पत देण्यास विलंब होण्याच्या बाबतीत भरपाई देण्यास बँक जबाबदार असणार नाही.

७. तत्काळ पत देण्यात आलेले धनादेश अदत्त परत आल्यामुळे, धनादेशावर करण्यात येणाऱ्या व्याजाची आकारणीः

ज्या धनादेशावर बँकेद्वारे तत्काळ पत देण्यात आली आहे असा वसूलीसाठी पाठविण्यात आलेला धनादेश अदत्त परत आल्यास, धनादेशाचे मूल्य हे खात्यावर तत्काळ खर्ची घालण्यात येईल. तत्काळ पत देण्यात आलेल्या तारखेपासून ते व्यवस्था तारखेपर्यंत ग्राहकाला कोणतेही व्याज आकारण्यात येणार नाही.

बँकेच्या बचत खात्यामध्ये धनादेशाची आवक जमा करण्यात आल्यास आणि ती रक्कम काढण्यात न आल्यास, धनादेश अदत्त परत आल्यावर अशी जमा करण्यात आलेली रक्कम ही व्याजाचा भरणा करण्यास पात्र होणार नाही. अधिकर्ष/कर्ज खात्यामध्ये आवक जमा करण्यात आल्यास, बँकेकडे निधी नसण्याच्या मर्यादेपर्यंत धनादेश/संलेख अदत्त परत आल्यास, पत देण्याच्या तारखेपासून ते नोंद मागे फिरविण्याच्या तारखेपर्यंत, अधिकर्षासाठी/कर्जासाठी लागू असणारा व्याज दर अधिक २% इतक्या दराने व्याजाची वसूली करण्यात येईल.